# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६,

दूरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune.dte@gmail.com; Website : www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३ (अ)/संप/२०२१/ ५२२८

**परिपत्रक (तात्काळ)**

दिनांक : 24 NOV 2021

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.संघटना१५२१/प्र.क्र.१५९/१६-अ दिनांक २३/११/२०२१

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने, या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था / कार्यालयातील सर्व अधिकारी/ कर्मचा-यांनी चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी विविध प्रलंबित मागण्या संदर्भात **दिनांक २५/११/२०२१** रोजी मोर्चामध्ये सहभागी होऊ नये.

शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत मोर्चा मध्ये भाग घेणे ही गैरवर्तणूकीची बाब समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

त्या अनुषंगाने सर्व शासकीय कार्यालयातील गट ब, गट क व गट ड अधिकारी/कर्मचा-यांना कळविण्यात येते की, त्यांनी **दिनांक २५/११/२०२१** रोजी मोर्चामध्ये सहभागी होवू नये, त्यांनी कर्तव्यावर उपस्थित रहावे. तसेच कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मोर्चा,निदर्शने करण्यास प्रतिबंध राहील. उपरोक्त कालावधीत कोणत्याही कर्मचा-याला कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही व मोर्चात सहभागी झाल्यास "काम नाही वेतन नाही" या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल, याची नोंद घ्यावी.

सोबत संचालनालयाचे दिनांक संदर्भिय परिपत्रक जोडले आहे. सोबतच्या परिपत्रकातील सुचना आपल्या संस्थेतील गट ब, गट क व गट ड कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात व दि. २५/११/२०२१ ची माहिती **प्रपत्र अ** मध्ये दि. २५/११/२०२१ रोजी <u>सकाळी ११.००</u> वाजेपर्यंत या कार्यालयाच्या **<u>est.ropune@gmail.com</u>** या ई-मेल सॉफ्टकॉपी पाठविण्यात यावी

**सोबत : सामान्य प्रशासन विभागचे दि. २३/११/२०२१ रोजीचे शासन परिपत्रक**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**प्रत - सर्व संस्था प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१) संचालक / प्राचार्य / उपसचिव,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था /कार्यालय यांना कळविण्यात येते की, हे परिपत्रक संस्थेतील अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे तसेच मोर्चात सहभागी होण्यापासून परावृत्त करावे. सदर परिपत्रक त्यांचे निदर्शनास आणलेबाबत त्यांची स्वाक्षरी घ्यावी.. तसेच मोर्चाच्या काळात मुख्यालय सोडून जावू नये व कोणत्याही प्रकारची रजा मंजुर करु नये.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

प्रपत्र अ

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

विभागीय कार्यालय तसेच त्यांचे अधिपत्याखालील सर्व शासकीय / कार्यालयतील अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची माहिती

दिनांक २५ नोव्हेंबर २०२१

| अ.क्र. | कार्यालय / संस्था | एकुण अधिकारी/कर्मचारी यांची (संख्या) | | | पुर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी/कर्मचारी यांची (संख्या) | | | मोर्चात सहभागी झालेले अधिकारी/कर्मचारी यांची (संख्या) | | | कार्यालयात उपस्थित असलेले अधिकारी/कर्मचारी यांची (संख्या) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गट ब | गट क | गट ड | गट ब | गट क | गट ड | गट ब | गट क | गट ड | गट ब | गट क | गट ड |
| १ | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे | | | | | | | | | | | | |
| २ | शासकीय अभियांत्रिकी महा. पुणे | | | | | | | | | | | | |
| ३ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महा. अवसरी (खूर्द) | | | | | | | | | | | | |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | | | | | | | | | | | | |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी (खुर्द) | | | | | | | | | | | | |
| ६ | महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे | | | | | | | | | | | | |
| ७ | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे | | | | | | | | | | | | |
| ८ | शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे | | | | | | | | | | | | |
| ९ | शासकीय अभियांत्रिकी महा. कराड | | | | | | | | | | | | |
| १० | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महा. कराड | | | | | | | | | | | | |
| ११ | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | | | | | | | | | | | | |
| १२ | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | | | | | | | | | | | | |
| १३ | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर | | | | | | | | | | | | |
| १४ | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | | | | | | | | | | | | |
| १५ | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | |

राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी मंत्रालयावर आयोजित करण्यात आलेल्या मोर्चासंदर्भात करावयाची कार्यवाही....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५२१/प्र.क्र.१५९/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२३ नोव्हेंबर, २०२१

**परिपत्रक**

राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र यांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात **दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१** रोजी मंत्रालय, मुंबई येथे मोर्चा नेणार असल्याची नोटीस शासनास दिली आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९, मधील नियम क्रमांक ६ नुसार शासकीय कर्मचाऱ्याने कोणत्याही संप/निर्दशनामध्ये सहभागी होऊ नये असे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक २९ अन्वये राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र यांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यभरातील बऱ्याच स्थानिक चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना या महासंघाशी संलग्न आहे. तसेच सदर आंदोलनास राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी पांठीबा दर्शविला आहे. त्यामुळे सदर राज्यव्यापी मोर्चामध्ये राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील गट ब, गट क व गट ड कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र यांच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या मोर्चाचे दिवशी, शासकीय/निमशासकीय कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग/ तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत :-

अ) शासकीय-निमशासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत मोर्चा मध्ये भाग घेणे गैरवर्तणूकीची बाब समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत शासनाच्या प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत मोर्चामध्ये भाग न घेण्याविषयी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा. तसेच कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मोर्चा, निदर्शने, आंदोलने करण्यास प्रतिबंध राहील.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये मोर्चा कालावधीत कार्यालयीन कामकाज व इतर सेवा सुरळीतपणे सुरु राहतील याबाबत उपाययोजना कराव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१११२३१७२३४९२७०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

MADHUKAR SARJERAO GHOGARE

Digitally signed by MADHUKAR SARJERAO GHOGARE
DN: CN = MADHUKAR SARJERAO GHOGARE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2021.11.23 17:27:34 +05'30'

(म.स.घोगरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
५. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई.
६. मा.सर्व सन्माननिय संसद/विधानपरिषद /विधानसभा सदस्य
७. मा.मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद/ विधानसभा) विधानभवन, मुंबई.
९. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४. प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व उप विभागीय अधिकारी/सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१९. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२०. सह सचिव/उप सचिव (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय ,मुंबई.
२१. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२३. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.